सहकलाकारांबद्दलचे फरिदाचे अनुभव...

सगळेच मला 'मोटी' म्हणायचे










फरिदा जलाल गेल्या पिढीतली एक सक्षम अभिनेत्री. तिच्या वाट्याला आलेल्या नायिकेच्या मोजक्या भूमिकाही तिने समर्थपणे साकारल्या पण हिंदीत नायिकेपेक्षा बहीण आणि आता आई-मावशी बनून टिकाव धरलेल्या या अभिनेत्रीच्या कारकीर्दीतील काही सहकलाकारांविषयीच्या हृद्य आठवणी...

□ नरेंद्र उपाध्याय

कोणत्याही अभिनेत्रीच्या जीवनात अनेक कलाकार येतात, पण त्यातले फारच थोडे तिच्या आजन्म लक्षात राहतात. या लेखात फरिदा जलालने आपल्या अशा निवडक सहकलाकारांच्या काही हृद्य आठवणी सांगितल्या आहेत. तिच्या मते ज्यांना ती कधीच विसरू शकत नाही, असे तिचे साथी कलाकार आहेत...



फरिदाः कालची...
...आणि आजची



सायरा-फरीदाः क्षण एक पुरे मैत्रीचा

राजेश खन्नाः *आराधना* चित्रपटाच्या सेटवर मी राजेशला पहिल्यांदा भेटले. चित्रीकरणाच्या पहिल्याच दिवशी राजेश खन्ना मला एकदम अबोल आणि गंभीर वाटला. शॉट देण्यापुरताच तो तोंड उघडत असे. आणि शॉट झाल्यानंतर एका कोपऱ्यात शांतपणे बसून राहात असे. अनेकदा असं व्हायचं की एखाद्या शॉटसाठी टेकवर टेक घ्यावे लागायचे. एकेका रिटेकबरोबर मी अधिकाधिक नर्व्हस व्हायची. पण राजेश खन्ना मात्र निर्विकार असायचा.

त्याच्या या स्वभावाची मला सवय झाली होती. पण जसजसे दिवस जाऊ लागले तसतसा राजेशही माझ्याशी मोकळेपणाने वागू लागला. सेटवर तो नेहमीच मला मोटी नावाने हाक मारायचा. एकदा *आराधना*च्याच सेटवर आम्ही एक दृश्य चित्रित करत होतो. अकरा रिटेक झाले, पण मनासारखा शॉट जमला नव्हता. माझ्या डोळ्यात पाणी तरळलं. मी खाली मान घालून हळूच डोळे टिपले तो समोर एक लॉलीपॉप दिसला. राजेश खन्नाने माझ्यासमोर तो धरला होता. काहीही न बोलता मी तो लॉलीपॉप घेतला. आणि हा सिलसिला सुरू झाला.

*आराधना*पासून *बंडलबाज*पर्यंत मी राजेश खन्नाबरोबर अनेक चित्रपट केले. पण खऱ्या अर्थाने राजेश खुलला तो *पलको की छाँव में*च्या सेटवर. *आराधना*चा राजेश आणि *पलको की छाँव में*चा राजेश यांच्यात जमीन आसमानचा फरक होता. हा राजेश अगदी मनमिळाऊ आणि गप्पिष्ट होता. सेटवर सगळ्यांची थट्टामस्करी करणारा. या अनुभवानेच मी एक गोष्ट शिकले. माणसाने स्वतःला न बदलण्याचा कितीही खटाटोप केला तरी काळ भल्याभल्यांना बदलायला भाग पाडतो.

दिलीपकुमारः दिलीपकुमार साहेबांबरोबर मी पहिल्यांदा काम केलं ते *गोपी* चित्रपटात. यात मी त्यांची लहान बहीण झाले होते. राजेश खन्नाप्रमाणेच माझ्या गोलमटोल शरीरयष्टीकडे बघून दिलीपजी मला नेहमीच मोटी म्हणायचे. नुसतं बोलून थांबायचे नाहीत. तर जाडी कमी करण्यासाठी वेगवेगळे उपाय सुचवत राहायचे. लंचच्या वेळेला स्वतःच्या पुढ्यात मसालेदार पदार्थ घेऊन माझ्यासमोर मात्र सलाडची डिश ठेवायचे.

एकदा *गोपी*च्या सेटवर एक गंमतीशीर गोष्ट झाली. एका सीनमध्ये खूश झालेले दिलीपजी मला लाडू भरवतात असं दृश्य होतं. आणि शॉट काही केल्या ओके होत नव्हता. प्रत्येक टेकला दिलीपजी माझ्या तोंडात एक लाडू कोंबायचे. असं करता करता सात आठ लाडू मी खाल्ले शेवटी कंटाळून मी दिलीपजींना सांगितलं, 'आता मला लाडू भरवू नका. नुसती भरवण्याची ॲक्टिंग करा.' यावर ते म्हणाले, नाही नाही. तसं केलं तर ते दृश्य वास्तविक वाटणार नाही. तुला लाडू खाल्लाच पाहिजे. वास्तवतेच्या या आग्रहापोटी मी अकरा लाडू फस्त केले. तेव्हा कुठे शॉट ओके झाला.

*गोपी*च्या सेटवर माझे दिलीपजींप्रमाणेच सायराजींबरोबरही मधुर संबंध जुळले. आम्ही चांगल्या मैत्रिणी झालो होतो. म्हणूनच मध्यंतरी त्यांनी *इस दुनिया के सितारे* कार्यक्रमाच्या ॲंकरिंगची जबाबदारी विश्वासाने माझ्यावर सोपवली. *गोपी*मुळे दिलीपजींबरोबर काम करण्याची माझी इच्छा पूर्ण झाली, पण तेव्हापासून मी हिंदी चित्रपटात धाकटी बहीण बनून राहिले.

संजीवकुमारः चित्रपट क्षेत्रातील इतर लोकांप्रमाणेच मीही त्यांना हरीभाई म्हणत असे. संजीवजींबरोबर काम करण्याची पहिली संधी *पारस* चित्रपटात मिळाली. अभिनेता म्हणून गंभीर वाटणारे हरीभाई स्वभावाने मात्र हसतमुख आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे होते. माझ्या जाडेपणावरून तेही भरपूर टर उडवत.

एकदा *पारस*च्या सेटवर असं दृश्य साकारायचं होतं की पिस्तुलची एक गोळी लागून मी मरते. सीन चालू असताना संजीवजी सेटवर होते. शॉट संपल्यावर गप्पा मारता मारता अचानक ते निर्मात्याला म्हणाले, या



पारसमध्ये संजीवकुमारबरोबर रोमँटिक भूमिकेत

चित्रपटाच्या यशाबद्दल मला शंका वाटते.' हे ऐकून निर्माता घाबरला. तेव्हा हरीभाई म्हणाले, 'अरे, इतकी ढोल बाई एका गोळीत मरताना दाखवलीय. लोक विश्वास तरी ठेवतील का?' त्यांच्या या बोलण्यावर आम्ही सगळेच खळखळून हसलो. *पारस*नंतर संजीवकुमारबरोबर मी *उलझन*मध्ये काम केलं. आणि तेव्हा त्यांच्या मनमोकळ्या स्वभावात किंचितही फरक पडलेला नाही. हे पाहून मला फार बरं वाटलं.

अमिताभ बच्चन: अमितजींबरोबर माझी ओळख तशी खूप जुनी. आमची पहिली ओळख झाली ती कलकत्त्याच्या एका समारंभात. त्यांना *आनंद*साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा आणि मला *पारस*साठी सर्वोत्कृष्ट सहअभिनयाचा पुरस्कार मिळाला होता. या समारंभात आमची दोस्ती झाली ती आजतागायत टिकून आहे. अमितजींबरोबर माझा पहिला चित्रपट *प्यार की कहानी*. पहिल्याच चित्रपटात ते मला आकर्षक आणि प्रभावशाली वाटले. अमिताभजी सहकलाकारांशी अत्यंत आदराने वागत. *प्यार की कहानी*च्या चित्रीकरणादरम्यान एकदा मी चांगला शॉट दिला. तेव्हा ते जोरात ओरडले, 'वा! फरिदाजी क्या छक्का मारा है.' हे ऐकून सेटवरचे सगळे हसायला लागले. जणू काही मी सेटवर शूटिंग करण्याऐवजी क्रिकेट खेळत होते. अमितजींबरोबर माझा दुसरा चित्रपट *मजबूर*. यातही मी त्यांच्या छोट्या बहिणीची भूमिका करत होते. ही बहीण अपंग असते. आणि कायम व्हिलचेअरवर असते. *प्यार की कहानी*मध्ये अमितजींच्या आवाजाने माझ्यावर जादू केली तर *मजबूर*च्या सेटवर त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वानेच मला भारून टाकलं. *मजबूर*च्या सेटवर ते मला अभिनेता म्हणून अधिक परिपक्व वाटले. मी तर त्यांना या युगाचा महान कलाकार म्हणते.



रणधीरने फरिदाला असं घाबरवलं की...

राज कपूर: त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि डोळ्यात अशी काही जादू होती की माणूस हमखास प्रभावित होणार. राजजींबरोबर मी पहिल्यांदा बॉबीमध्ये काम केलं. त्यावेळी इतक्या महान दिग्दर्शकाबरोबर काम करण्याची संधी मिळाली म्हणून मी फार खुशीत होते. राज कपूरजींबद्दल इंडस्ट्रीत अनेक प्रवाद होते. ते अभिनेत्रींना तोकड्या कपड्यांत दाखवतात असं म्हटलं जायचं. त्यातच भर म्हणून रणधीर कपूरने मला घाबरवलं, 'बघ, पापाजी तुला एकदा तरी बिना कपड्यांत कॅमेऱ्यासमोर उभं करतात की नाही ते.' झालं शूटिंगदरम्यान माझ्या मनावर सतत तेच दडपण असायचं. *बॉबी*चं चित्रीकरण पूर्ण झालं आणि माझी भीती खोटी ठरली.

दिग्दर्शक म्हणून राज कपूर अतिशय शिस्तप्रिय होते. व्यक्ती म्हणून तितकेच प्रेमळ. *बॉबी*नंतर मला त्यांनी दुसऱ्यांदा ऑफर दिली ती *हिना*साठी. मी चित्रपट व्यवसायात परतायचं ठरवलं आणि राज कपूरनी मला *हिना*साठी विचारणा केली. मीं लगेच होकार दिला. पण चित्रीकरणादरम्यान मला समजलं की यात माझी भूमिका आईची आहे. केसांना पांढरा रंग लावून मला बुढ्ढी बनवलं तेव्हा थोडंसं खटकलं. पण एकदा चित्रपट साइन केल्यावर मी नकारही देऊ शकत नव्हते आणि अशाप्रकारे हिंदी चित्रपटांत आईच्या भूमिकांसाठी माझ्या नावावर शिक्कामोर्तब झालं आणि त्याचं श्रेय अर्थातच राज कपूरजींना द्यायला हवं. ●